रामनारायण रूईया स्वायत्त महाविद्यालय

मराठी विभाग

दिनांक : ६ मार्च, २०१९.

मराठी विषय अभ्यासक्रम समिती बैठक

* 'अजेंडा आणि चर्चा

मराठी विभागातर्फे स्वायत्त रामनारायण रूईया महाविद्यालयाच्या मराठी विषयाच्या अभ्यासक्रम समितीची बैठक बुधवार, दिनांक ६ मार्च २०१९ रोजी महाविद्यालयामध्ये दुपारी १ वाजता आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस मराठी विषय अभ्यासक्रम समितीचे सदस्य उपस्थित होते. या बैठकीत रामनारायण रूईया स्वायत्त महाविद्यालयातील प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्ष मराठीच्या अभ्यासक्रमावर चर्चा झाली. बैठकीत चर्चेला आलेले मुद्दे पुढीलप्रमाणे –

- उपस्थित सर्वच सभासदांचे स्वागत करून बैठकीस सुरुवात झाली. शैक्षणिक स्वातंत्र्य अधिक चांगल्यारितीने पुढील काळात कसे अंमलात आणता येईल याबद्दल अनेक स्वागतार्ह सूचना याही बैठकीमध्ये केल्या.
- या सूचनांवर साधकबाधक चर्चा होऊन त्यांचा अंतर्भाव अभ्यासक्रमात टप्प्याटप्प्याने केला जाईल असा निर्वाळा मराठी विभागाने दिला.
- सत्र पहिले, सत्र तिसरे आणि सत्र पाचवे यांच्या प्रश्नपत्रिका दाखवण्यात आल्या. त्या पाहून नियमानुसार आहे असा निर्वाळा समितीने दिला. कोणत्याही तऱ्हेच्या सूचना देण्यात आल्या नाहीत.
- प्रथम वर्ष ऐच्छिक मराठी या विषयाच्या कविता या वाङ्मयप्रकाराला समजून घेण्यासाठी विभागाच्या प्रा. शिल्पा नेवे यांनी 'वेध मराठी कवितेचा' या संपादित पुस्तकाच्या रूपाने कवितांचे संकलन आणि संपादन करून कविता या वाङ्मयप्रकाराविषयी सैद्धांतिक विवेचन केले आहे. विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडविण्याच्या दृष्टीने संदर्भासाठी तयार करण्यात आलेल्या या पाठ्यपुस्तक स्वरुपाच्या पुस्तकास उपस्थित सदस्यांकडून अनुमोदन मिळाले.
- मराठी विभागातर्फे येत्या शैक्षणिक वर्षात एक प्रमाणपत्र अभ्यासक्रम घेण्याचे ठरते आहे. त्याची आखणी आणि अंमलबजावणी अनघा पेंडसे आणि सहकारी करतील. अनघा पेंडसे यांनी या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे स्वरूप, त्याची अंमलबजावणीसाठी लागणाऱ्या तासिका आणि त्यासाठी घेण्यात येणारी परीक्षा आणि दिला जाणारा प्रकल्प या सर्व मुद्द्यांचे सविस्तर विवेचन केले. संभाव्य अडचणी बैठकीसमोर सांगून त्यासाठीचे उपाय चर्चिले गेले. सदस्यांनी आपापली मते मांडली आणि एकमताने हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम या बैठकीत मंजूर झाला.

Scanned with CamScanner

- प्रथम वर्ष कला शाखेच्या ऐच्छिक मराठी या विषयाच्या प्रस्तावित अभ्यासक्रमास चार वर्षे पूर्ण झालेली असल्यामुळे नेमलेल्या 'जांभूळ आख्यान' आणि 'राहिले दूर घर माझे' या नाटकांमध्ये जूनपासून सुरू होणाऱ्या शैक्षणिक वर्षाच्या बैठकीमध्ये बदल केले जावेत अशी चर्चा झाली. नवीन नाट्यकृती दरम्यानच्या काळात निश्चित होऊन जून महिन्यात होणाऱ्या बैठकीत मंजूर होतील असा निर्णय झाला. त्याचप्रमाणे नाटकाऐवजी एकांकिका वाङ्मयप्रकाराचा विचार करावा असे मत मांडण्यात आले.
- तृतीय वर्ष कला शाखा मराठीच्या अभ्यासपत्रिका क्र. ३ मध्ये 'फिर्याद' या कवितासंग्रहाऐवजी दलित कविता संकलित करून त्यासाठी कालखंड निश्चित करून कवितांची निवड करावी यासाठी अनुमोदन मिळाले.
- तृतीय वर्ष कला शाखा मराठीच्या अभ्यासपत्रिका क्र. ५ विषयाच्या प्रस्तावित अभ्यासक्रमात नेमलेल्या 'मृण्मयी' आणि 'उद्ध्वस्त धर्मशाळा' या कलाकृतींमध्येसुद्धा जूनपासून सुरू होणाऱ्या शैक्षणिक वर्षाच्या बैठकीमध्ये बदल कळविण्यात येतील असा निर्णय झाला.
- तृतीय वर्ष कला शाखा मराठीच्या अभ्यासपत्रिका क्र. ६ मध्ये 'घाशीराम कोतवाल' ही नाट्यकृती आणि 'कोर्ट' हा चित्रपट परीक्षणासाठी नेमण्यात आलेला असून येत्या शैक्षणिक वर्षापासून नेमण्यात आलेले नाटक आणि चित्रपट बदलण्याच्या प्रस्तावाला मंजूरी मिळाली.
- सदर बैठकीत प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष आणि तृतीय वर्ष मराठी विषयाच्या उत्तरपत्रिका तपासणी मंडळाची नावे मंजूर करून घेण्यात आली. (Examiner and Moderator)
- बैठकीच्या अखेरीस सदस्यांचे आभार मानून पुढील बैठकीचे आमंत्रण देऊन बैठक संपन्न झाली.

**अभ्यासक्रम समिती सदस्य:** उपस्थिती

**प्रा. लीना केदारे (प्रमुख, मराठी विभाग, रामनारायण रूईया स्वायत्त महाविद्यालय)** Lkedare

**प्रा. डॉ. अनिल सपकाळ (प्रमुख, मराठी विभाग, कुलगुरू नियुक्त सदस्य, मुंबई विद्यापीठ)** [signature]

**प्रा. शिल्पा नेवे (सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, रामनारायण रूईया स्वायत्त महाविद्यालय)** [signature]

**डॉ. तुकाराम रोंगटे (विषयतज्ज्ञ)**

**डॉ. प्रभाकर देसाई (विषयतज्ज्ञ)**

**श्री. राजीव खांडेकर (व्यावसायिक तज्ज्ञ)**

**अनघा पेंडसे (माजी विद्यार्थी प्रतिनिधी)** अ. पेंडसे ✓

Scanned with CamScanner

शिक्षण प्रसारक मंडळींचे

# रामनारायण रुईया स्वायत्त महाविद्यालय

## मराठी विभाग

दिनांक : २१ ऑगस्ट, २०१९

## मराठी विषय अभ्यासक्रम समिती बैठक

"अजेंडा आणि चर्चा"

रामनारायण रुईया स्वायत्त महाविद्यालयाच्या मराठी विषयाच्या अभ्यासक्रम समितीची बैठक बुधवार, दिनांक २१ ऑगस्ट २०१९ रोजी महाविद्यलयामध्ये दुपारी १ वाजता आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस मराठी विषय अभ्यासक्रम समितीचे सदस्य उपस्थित होते. या बैठकीत रामनारायण रुईया स्वायत्त महाविद्यालयातील प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्ष मराठीच्या अभ्यासक्रमावर चर्चा झाली. बैठकीत चर्चेला आलेले मुद्दे पुढीलप्रमाणे –

- उपस्थित सर्वच सभासदांचे स्वागत करून बैठकीस सुरुवात झाली. शैक्षणिक स्वातंत्र्य अधिक चांगल्यारितीने पुढील काळात कसे अंमलात आणता येईल याबद्दल अनेक स्वागतार्ह सूचना या बैठकीमध्ये करण्यात आल्या.
- प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष आणि तृतीय वर्ष - सत्र २, सत्र ४ आणि सत्र ६ मराठीच्या सत्रांत परीक्षेच्या प्रश्नपत्रिका सदस्यांना दाखविण्यात आल्या. त्याबद्दल त्यांचे मत विचारण्यात आले. त्यांनी प्रश्नपत्रिकांबाबत समाधान व्यक्त केले.
- प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष आणि तृतीय वर्ष मराठीच्या विद्यार्थ्यांना दिल्या गेलेल्या प्रकल्प विषयांबद्दल विभागातील अध्यापक शिल्पा नेवे आणि डॉ. लीना केदारे यांनी सविस्तर माहिती दिली.
- प्रकल्प विषयांमध्ये विद्यार्थ्यांचे सादरीकरण, तसेच गुगल क्लासरुमवर प्रकल्प स्वीकारण्याचा पर्याय विद्यार्थ्यांना देण्यात आला. याविषयी अभ्यासमंडळ सदस्यांनी आनंद व्यक्त केला.
- प्रकल्प विषय कल्पक असून त्यातून विद्यार्थ्यांना विषयाची समज मिळण्यासोबतच विषयातील स्वारस्य वाढण्यासही मदत होऊ शकते असे मत सदस्यांनी व्यक्त केले.
- २०१९ - २०२० हे शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यापासून मराठी विभाग व मराठी भाषा आणि वाङ्मय मंडळ यांनी घेतलेल्या उपक्रमांची माहिती देण्यात आली.
- 'नॅक' आणि IQAC यांच्याकडून आलेल्या सूचनेनुसार विभागातील माजी विद्यार्थ्यांची नोंद आणि त्यांची विविध कार्यक्षेत्रे याचे तपशील गोळा करण्यासाठी गुगल फॉर्म तयार करण्यात आला आहे. त्याची माहिती विभागातर्फे देण्यात आली.
- २०२० - २०२१ या शैक्षणिक वर्षात अभ्यासक्रमात कोणकोणते बदल करावेत याविषयी सूचना करण्याची विनंती समितीला करण्यात आली.
- अंतर्गत मूल्यमापन परीक्षेकरिता बहुपर्यायी प्रश्नांचा वापर कोणकोणत्या विषयपत्रिकांना करण्यात येईल याबद्दल चर्चा झाली. अनिवार्य मराठी (प्रथम वर्ष कला), मराठी पेपर १ (द्वितीय वर्ष कला), मराठी पेपर १ आणि पेपर ३(तृतीय वर्ष कला) या विषयपत्रिकांना बहुपर्यायी वस्तुनिष्ठ प्रश्न

Scanned with CamScanner

विचारण्यास आणि संगणकीकृत परीक्षा घेण्यास अभ्यासमंडळ सदस्यांनी मंजुरी दिली. मात्र विद्यार्थ्यांना उत्तरे लिहिण्याचा सराव राहणे तेवढेच आवश्यक असल्यामुळे उर्वरित सर्व अभ्यासपत्रिकांमध्ये केवळ वस्तुनिष्ठ प्रश्न असू नयेत, तर मुख्य परीक्षेच्या दृष्टीने उत्तरे लिहिण्याचा सराव होऊ शकेल अशा प्रश्नांचा समावेश असावा अशी भूमिका अभ्यासमंडळ सदस्यांनी घेतली.

- तसेच प्रकल्पांमध्ये प्रकल्प लेखनाला ५ गुण, सादरीकरणला ५ गुण आणि मुलाखतीला (viva) ५ गुण आणि विद्यार्थ्याची वर्गातील उपस्थिती व विभागातील क्रियाशील सहभाग यासाठी ५ गुण अशी विभागणी २० गुणांच्या प्रकल्पांमध्ये असावी, असे मत सदस्यांनी व्यक्त केले.
- शैक्षणिक वर्ष २०१९ - २०२० मधील सत्र १ ते सत्र ६ यासाठी नियुक्त केलेल्या मॉडरेटर्सची माहिती विभागप्रमुखांनी समितीस दिली. त्या नावांना सर्व समिती सदस्यांनी अनुमोदन दिले.
- बैठकीच्या अखेरीस सदस्यांचे आभार मानून बैठकीचे आमंत्रण देऊन बैठक संपन्न झाली.

उपस्थिती

**अभ्यासक्रम समिती सदस्य :**

**डॉ. लीना केदारे (प्रमुख, मराठी विभाग, रामनारायण रुईया स्वायत्त महाविद्यालय)**

**प्रा. डॉ. अनिल सपकाळ (प्रमुख, मराठी विभाग, कुलगुरू नियुक्त सदस्य, मुंबई विद्यापीठ)**

**प्रा. शिल्पा नेवे (सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, रामनारायण रुईया स्वायत्त महाविद्यालय)**

**डॉ. तुकाराम रोंगटे (विषयतज्ज्ञ)**

**डॉ. प्रभाकर देसाई (विषयतज्ज्ञ)**

**मा. राजीव खांडेकर (व्यावसायिक तज्ज्ञ)**

**अनघा पेंडसे (माजी विद्यार्थी प्रतिनिधी)**

Scanned with CamScanner